गोकुळच्या अंगणातला नटखट नंदलाल

मुरलीच्या सुरांत, माखणाच्या गंधात आणि गवळ्यांच्या गजरात हरवलेला बालकृष्ण गोकुळच्या एखाद्या पारावर आजीच्या ओठांवर गवळण सुरू होते आणि काळ जणू उलटा फिरतो. अंगणात धुळीचा खेळ रंगतो, गाईंच्या गळयातील घंटा रुणझुणतात, यमुनेच्या वाऱ्यावर मुरलीचा सूर तरंगतो आणि यशोदामाईच्या अंगणातला तो नटखट कान्हा पुन्हा एकदा डोळ्यांसमोर उभा राहतो

मथुरेच्या कारागृहात देवकीच्या उदरी जन्मलेला कृष्ण गोकुळात यशोदामाईच्या कुशीत वाढला. पण गोकुळाला तो परमात्मा वाटला नाही; तो वाटला आपला कान्हा! धुळीत लोळणारा, गाई-वासरांच्या मागे धावणारा, पेंद्या-सुदाम्यासोबत खेळणारा आणि नंदबाबांच्या अंगणात खोड्या करणारा नंदलाल!

डोक्यावर मोरपिसांचा मुकुट, कमरेला पितांबर, खांद्यावर घोंगडी आणि ओठांशी मुरली त्याच्या या रूपात गोकुळची सारी माया सामावली होती.

पण कान्ह्याची खरी ओळख होती—त्याच्या खोड्या!

गोकुळातील घराघरांत लोण्याचे हंडे टांगलेले असायचे आणि कान्ह्याची नजर मात्र नेमकी त्यांच्यावर! मित्रांची टोळी जमायची. एकाच्या खांद्यावर दुसरा, त्यावर तिसरा हंडी फुटायची आणि लोण्याचा प्रसाद सगळ्यांच्या वाट्याला यायचा. मग गौळणी यशोदामाईकडे धावायचा "यशोदे ग, तुझा मुरारी, छळीतो आम्हाला ग भारी!"

यशोदा रागाने कृष्णाला विचारायची, "कान्हा, माखण तू खाल्लंस?" कृष्णाचा चेहरा निरागस! "मै नहीं माखन खायो असं म्हणताच यशोदामाईच्या ओठांवरही हसू यायचं.

एकदा कृष्णाने माती खाल्ली अशी तक्रार सवंगड्यांनी केली. यशोदामाईने त्याला रागाने तोंड उघडायला सांगितले. कृष्णाने तोंड उघडले आणि आईच्या डोळ्यांसमोर पृथ्वी, आकाश, सूर्य, चंद्र, पर्वत, नद्या संपूर्ण ब्रह्मांड सामावलेले दिसले!

क्षणभर आई थबकली. पण पुढच्याच क्षणी मायेने विराट सत्य झाकून टाकले. ब्रह्मांडाचा स्वामी पुन्हा तिच्या कुशीतला बाळ झाला.

कधी यशोदेच्या हातून सुटून उखळ ओढत धावणारा कान्हा, कधी गौळणींच्या घागरी फोडणारा, तर कधी त्यांच्या वाटेवर अचानक उभा राहून खोडकर हसणारा—त्याच्या प्रत्येक लीलेत गोकुळ हसत होते. कृष्णाची मुरली वाजली की मात्र सगळे काही थांबायचे. गाई चरणे विसरायच्या, वासरे धावत यायची आणि गौळणींची कामे हातातच थांबायची. त्या सुरांत काहीतरी जादू होती. तो स्वर कानावर पडला की मन नकळत कान्ह्याकडे ओढले जायचे.

पेंद्या, सुदामा, वाकड्या, बोबड्या आणि गवळबालांची टोळी म्हणजे कान्ह्याचे छोटेसे विश्वच होते. त्यांच्यासोबत धावणे, खेळणे, गाई चारणे, चिखलात लोळणे—या सगळ्यातच त्याचे बालपण फुलले.

कृष्णाच्या बाललीला म्हणजे केवळ पुराणकथा नाहीत. त्या आपल्या लोकसंस्कृतीच्या स्मृती आहेत. आजही गोकुळाष्टमीला दहीहंडी फुटते, "गोविंदा आला रे!"चा गजर होतो आणि प्रत्येकाच्या मनातला बालकान्हा जागा होतो.

कारण कृष्ण मोठा झाला, काळ पुढे गेला; पण गोकुळच्या आठवणीत तो आजही तसाच आहे यशोदामाईच्या कुशीतला लाडका,

गौळणींचा नटखट मुरारी,

पेंद्या-सुदाम्यांचा जिवलग सखा,

आणि गोकुळच्या अंगणातला आपला नंदलाल!

"गोविंदा रे गोपाळा यशोदेच्या नंदलाला!"

सौं. संपदा मधुसूदन हरयाण
प्रोप्रा. आकार पब्लिसिटी
मोबाईल
9768110020/ 9892780722

जाहीर नोटीस

सदर सार्वजनिक सुचनेद्वारे मी तमाम जनतेस माझे अशिल श्रीमती बिमला विजय बहादूर शर्मा राहणार फ्लॅट नं.७०२, बिल्डिंग नं. ११/बी, राधाकृष्ण ११ / बी एस. आर. ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, संघर्ष नगर, चांदिवली फार्म रोड, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०७२ . यांच्या वतीने सूचित करतो की, माझ्या अशिलांनी वरील फ्लॅटचे मुळ मालक श्री. शर्मा शंकर वासुदेव यांना झोपुप्रा योजनेनुसार वनविभाग झोपडपट्टी पुनवर्सन प्राधीकरण संजय गांधी नॅशनल पार्क, बोरिवली पुर्व, मुंबई - ४०००६६ यांच्याकडुन जा. क्र. ब/२०/ जमीन/ ९७२/२००८-०९ बोरिवली दि.२२.०४.२००८ रोजी प्राप्त झालेली सदनिका माझे अशिल श्रीमती. बिमला विजय बहादूर शर्मा यांनी श्री. शर्मा शंकर वासुदेव यांच्या कडून १७ वर्षापुर्वी विक्री करार दि . २० .०४ . २००९ द्वारे खरेदी केलेली आहे. तसेच दि.२०.०४. २००९ रोजी नोटराईज कुलमुखत्यार पत्र करून दिलेले आहे. आता माझे अशिल तो विक्री करार नोंदणीकृत करू इच्छित आहेत पण ते मुळ मालक श्री. शर्मा शंकर वासुदेव यांचा फार वेळापासून अथक संपर्क / प्रयत्न केल्यानंतरही काही शोध लागलेला नाही. कोणत्याही व्यक्तीकडे त्यांचा काही संपर्क किंवा सदर मालमत्ता/तीचा काही भाग बाबतीत कोणत्याही व्यक्तीकडे विक्री, विनिमय, तारण, भाडे, कर्ज शुल्क, अधिकार, बदली, समभाग, रूची, देखभाल, परवाना, भेट, वारसा, सामायिकता, मालकी, ताबा किंवा अन्य स्वरूपात कोणताही दावा / हक्क / आक्षेप असल्यास त्यांनी ही जाहीर सुचना प्रसिध्द झालेल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत पुरेशा कागदोपत्री पुराव्यासहीत माझ्या अशिलांना किंवा मला माझ्या खालील कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा, जर असे कोणतेही दावे न मिळाल्यास उपरोक्त फ्लॅट किंवा त्यांचा काही भाग इत्यादी बाबत कोणाचीही काहीच हरकत नाही. असे समजले जाईल आणि माझ्या अशिलांना विक्री करार नोंदणीकृत करण्यासाठी मोकळीक राहील. जर कुणाचेही दावे / हरकती १५ दिवसांनंतर कोणत्याही स्वरूपात मिळाल्यास ते सोडून दिले किंवा माफ केले असे समजून स्विकारले जाणार नाहीत .

दिनांक: ०४-०९-२०२६ **सही /-**
ठिकाण : मुंबई **ॲड. शंकर एल. शेलार**
(अधिवक्ता उच्च न्यायालय, मुंबई)
पत्ता 8 ५५०, प्लॉट नं . सी / २५२, संत कृपा कॉ ऑप हौ. सोसा. लि., सेक्टर १, घणसोली, नवी मुंबई ४००७०१ मो नं. ९८२०७९७१६३

PUBLIC NOTICE

For loss of Sale Agreement

As per my client instruction notice is hereby given that the property bearing Block No.68, Chawl No.1, Azad Nagar, Khadi Machine Road, Shivaji Nagar, Mumbra, Dist. Thane, which stands in the name of Mehboob Bi Kalandar Shah.

That Mehboob Bi Kalandar Shah did purchase the above said property from Shri. Madar Shah, which has been lost/misplaced.

FIR Lodge before Mumbra Police Station, vide missing complaint G.D.No. 073, registration number: 1089/2026, dtd.: 24/08/2026.

That Shri. MADAR SHAH got the allotment of the said property from M/s. Altanta Infrastructure Ltd vide Allotment dated: 13/05/2003.

All person are hereby informed not to deal or carry out any transaction with anyone on the basis of the said missing document. If anyone has already carried out or being carried out kindly inform the undersigned in writing on the below mentioned address within 7 days from this present.

Date: 03/09/2026
Place: Mumbra, Thane **Sd/-**
Adv. Sameer M. Shaikh
Add.: H/05, Rumana CHS, Sharifa Road, Amrut Nagar, Mumbra, Dist. Thane - 400612
Contact: +91-9867705589

जाहीर नोटीस

सूचना याद्वारे आम जनतेस याद्वारे देण्यात येते की, या सूचनेत फ्लॅट क्र. ७०४, ७ वा मजला, 'ए' विंग, दोस्ती डॅफोडिल (दोस्ती एकर्स) को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेड, शेख मिस्री रोड, वडाळा पूर्व, मुंबई ४०००३७ (सदरील जागेस सदरील फ्लॅट असे संबोधले आहे), तरी हेमल के खंबाट्टा आणि कीर्ती एन. खंबाट्टा यांनी 'मेसर्स दोस्ती असोसिएट्स' यांच्याकडून सदर फ्लॅटची जागा खरेदी केली होती; यासाठी १४/०५/२००४ रोजी 'विक्री करार' करण्यात आला होता, जो दि. २९/०५/२००४ रोजी उप-निबंधक (मुंबई शहर २) यांच्या कार्यालयात नोंदणी क्रमांक ३८२०/२००४ अन्वये योग्यरित्या नोंदविला गेला होता आणि त्यानंतर त्यांनी सदर रूम च ताबा घेतला होता.

त्यानंतर, २८/०१/२०१७ रोजी कीर्ती एन. खंबाट्टा यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात कल्पना के. खंबाट्टा (पत्नी), जय कीर्ती खंबाट्टा (मुलगा) आणि हेमल कीर्ती खंबाट्टा (मुलगा) हे कायदेशीर वारस म्हणून राहिले. मृत व्यक्तीचा सदर मालमत्तेत ५०% हिस्सा असल्याने, कल्पना के. खंबाट्टा (पत्नी) आणि जय कीर्ती खंबाट्टा (मुलगा) यांनी त्यांचा २/३ हिस्सा हेमल कीर्ती खंबाट्टा यांच्या नावे 'हक्क-सोड पत्र' द्वारे हस्तांतरित केला; हा दस्तऐवज ०९/०३/२०२४ रोजी उप-निबंधक (मुंबई शहर २) यांच्या कार्यालयात नोंदणी क्रमांक ५७६४/२०२४ अन्वये योग्यरित्या नोंदविला गेला आणि अशा प्रकारे हेमल कीर्ती खंबाट्टा हे सदर फ्लॅटचे १००% मालक बनले.

सदर हेमल कीर्ती खंबाट्टा यांनी १३/०६/२०२४ रोजी 'विक्री दस्तऐवज' द्वारे सदर फ्लॅट सध्याचे विक्रेते धिमंत चंपकलाल मेहता आणि गीता धिमंत मेहता यांच्या नावे हस्तांतरित केला; हा दस्तऐवज १३/०६/२०२४ रोजी उप-निबंधक (मुंबई शहर ३) यांच्या कार्यालयात नोंदणी क्रमांक १२२९४/२०२४ अन्वये योग्यरित्या नोंदविला गेला होता. आता सदर धिमंत चंपकलाल मेहता आणि गीता धिमंत मेहता हे सदर फ्लॅटची जागा गिरीश भवरलाल औदिच्य आणि रिंकू गिरीश औदिच्य यांच्या नावे हस्तांतरित करण्यास इच्छुक आहेत

तरी याद्वारे हक्कांची पडताळणी करत आहोत. सर्व व्यक्तीस वरील सदर मालमत्तेच्या संबंधात कोणतेही दावे, हक्क, अधिकार, हक, हितसंबंध वा मागण्या काही असल्यास तसेच विक्री, हस्तांतरण, जप्ती, गहाण, ताबा, धारणाधिकार, भाडेकरार, न्यास, भेट, प्रभार, सुविधाधिकार, वारसा, देखभाल वा अन्य काही असल्यास त्यांनी याद्वारे सदर दाव्यांच्या संबंधात दस्तावेजांसह लेखी स्वरूपात अधोहस्ताक्षरित यांना त्यांचे कार्यालय येथे सदर प्रसिद्धी तारखोपासून ७ दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा आम्ही सदर मालमत्ता वा कोणत्याही भागाच्या संबंधात कोणतेही हक्क, दावे, अधिकार वा मागण्या काही नाही असे गृहित धरू व कोणतेही सबंधित काही असल्यास ते दावे अधित्यागीत वा परित्यागीत मानले जातील.

दि. ४ ऑगस्ट २०२६ **ईस्माईल गुडू हंगरगे**
वकील, उच्च न्यायालय, मुंबई
2रा मजला, कॉंग्रेस हाऊस, भोईवाडा न्यायालयासमोर, बिसलेरी व्हॉलसेलरच्या वर, भोईवाडा परेल मुंबई 400012

जाहीर नोटीस

सदर जाहिर सुचना हि श्रीमती. नसीमा मुस्ताक अंसारी हयांच्या वतीने देत असून त्याचे पती कै. मो. मुस्ताक मो. बशीर अंसारी यांच्या नावे सदनिका क्र. ३०३, बिल्डींग नं. आर - २, एकता सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.) दत्त मंदिर जवळ, विष्णु नगर, एल. यु. गडकरी मार्ग, चेंबूर (पूर्व) मुंबई – ४०००७४यांच्या नावे असून त्यांचा मृत्यू दि.२७/०७/२०१९ रोजी झाला आहे.

श्रीमती. नसीमा मुस्ताक अंसारी हयांना पत्नी या नात्याने त्यांचे नावे सदर सदनिका हस्तांतरीत करावयाची आहे तसेच सदर खोलीची विक्री करावयाची आहे. जर कोणा व्यक्तींस किंवा संबंधीत अधिकारी, हया रूम संदर्भात दावा, हक्क, वारसाहक्क, मालकी हक्क, अदलाबदल, तारण, ताबा किवा विकास अधिकार किंवा अन्य इतर करारनामा, विक्री, बक्षीस, भाडेपट्टा, वहिवाट, असल्यास त्यांनी सदर सूचना प्रकाशन तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत वर नमूद केलेल्या पत्त्यावर स्वाक्षरी कर्त्यांकडे सर्व आवश्यक दस्ताऐवज पुराव्यांच्या प्रतिसह लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा असे दावा विवाद किंवा आक्षेपाच्या संदर्भाशिवाय आमचे अशिलांकडून सदर सदनिका त्यांच्या नावे केली जाईल आणि दावा असल्यास ते त्याग किंवा स्थगित केले आहेत असे समजले जाईल आणि आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही

दिपक एस. जाधव
ॲड. हाय कोर्ट
शॉप नं. ३१/२, जनता मार्केट, रेल्वे स्टेशन जवळ, चेंबूर, मुंबई - ४०००७१
मो. नं. ७०४५३८२०८८

सेया इंडस्ट्रीज लि.

सीआयएन : L99999MH1990PLC058499 कार्यालय : टी-१४, एमआयडीसी, तारापूर, बोईसर (पश्चिम), पालघर – ४०१ ५०६ .
Mail: corporate@seya.in, Webside : www.seya.in
३६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस, पुस्तक बंद आणि ई-मतदान

याद्वारे नोटीस देण्यात आली आहे की

सेया इंडस्ट्रीज लिमिटेड ("कंपनी") च्या सदस्यांची ३६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') (आयपीओनंतर) सोमवार, ३० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता टी-१४, एमआयडीसी, तारापूर, बोईसर (पश्चिम), पालघर ४०१५०६ येथील नोंदणीकृत कार्यालयात होणार आहे.

एमसीएच्या परिपत्रकानुसार ५ मे २०२० आणि ५ मे २०२२ आणि सेबीचे परिपत्रक क्र. सेबी/एचओ / सीएफडी/सीएमडी१/सीआयआर / पी / २०२० / ७९ दिनांक १२ मे २०२०, आर्थिक वर्ष २०२५ -२०२६च्या वार्षिक अहवालासह वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस केवळ अशा सदस्यांना ईमेलद्वारे पाठविली जाईल ज्यांचे ईमेल आयडी कंपनी / डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत आहेत. २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठीवार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या संकेतस्थळावर www.seya.in बीएसई आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com क्रमांकावर उपलब्ध असेल.

कंपनी अधिनियम, २०१३ ('कायदा') च्या कलम ९१ नुसार व त्याअंतर्गत कंपनीच्या सभासद नोंदणी व शेअर हस्तांतरण पुस्तिकांनुसार ३६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या उद्देशाने गुरुवार, २४ सप्टेंबर २०२६ ते बुधवार, ३० सप्टेंबर २०२६ (दोन्ही दिवसांचा समावेश) या कालावधीत बंद राहतील.

रिमोट ई-व्होटिंग सुविधा रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ०९.०० वाजल्यापासून सुरू होईल आणि मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ रोजी संध्याकाळी ५.००वाजता संपेल.

रिमोट ई-व्होटिंगला वरील तारीख आणि वेळेच्या पुढे परवानगी दिली जाणार नाही.

कटऑफ तारखेला, म्हणजे बुधवार, २३ सप्टेंबर २०२६ रोजी सदस्य/लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये ज्या व्यक्तीचे नाव आहे, त्यालाच बैठकीत रिमोट ई-व्होटिंग / व्होटिंगच्या सुविधेचा लाभ घेता येईल.

नोटीस पाठवल्यानंतर शेअर्स मिळवणारी आणि कंपनीची भागधारक बनलेली आणि कट ऑफ तारखेपर्यंत शेअर्स धारण करणारी व्यक्ती आपला फोलिओ नंबर नमूद करून helpdesk.evoting@cdslindia.com किंवा rnt.helpdesk@linkintime.co.in ई-मेल पाठवून लॉगिन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून रिमोट ई-व्होटिंग करू शकते. / डीपी आयडी / क्लायंट आयडी, तथापि, जर भागधारक दूरस्थ ई-मतदानासाठी सीडीएसएलमध्ये आधीच नोंदणीकृत असेल तर विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड चा वापर मतदान करण्यासाठी केला जाऊ शकतो. सदस्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत ई- व्होटिंग आणि मतदान करण्याची पद्धत कंपनीच्या संकेतस्थळावर www.seya.in आणि शेअर बाजाराच्या संकेतस्थळावर म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या संकेतस्थळावर अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com आणि सीडीएसएलच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल www.evotingindia.com

ई-व्होटिंगच्या माध्यमातून मतदानाचा हक्क बजावल्यानंतरही सदस्य सभेमध्ये सहभागी होऊ शकतो, परंतु त्याला महासभेत पुन्हा मतदान करता येणार नाही

इलेक्ट्रॉनिक मतदानाशी संबंधित कोणत्याही प्रश्नांसाठी सदस्य helpdesk.evoting@cdslindia.com पत्र लिहू शकतात.

ज्या सदस्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केले नाही, ते वार्षिक सर्वसाधारण सभेत आपला मतदानाचा हक्क बजावू शकतात. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठिकाणी कंपनी यासंदर्भात आवश्यक ती व्यवस्था करेल.

तुमचा विश्वासू,
सेया इंडस्ट्रीज लिमिटेड (सीआयआरपी अंतर्गत)
०३ सप्टेंबर २०२६ **भावेश राठोड**
अंतरिम समाधान व्यावसायिक
रेगन नं. आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०१२००/२०१८-२०१९/११९१०

CHEMTECH
INDUSTRIAL VALVES LTD

केमटेक इंडस्ट्रियल व्हॉल्व्हज लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: 503, सनराईज बिझनेस पार्क, प्लॉट क्र. B-68, रोड क्र.-16, किसान नगर - 2 जवळ, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे – 400604, महाराष्ट्र
CIN: L29299MH1997PLC105108
वेबसाईट: www.chemtechvalves.com
ई-मेल: investors@chemtechvalves.com **दूरध्वनी**: 02269753500

३० व्या (तीसाव्या) वार्षिक सर्वसाधारण सभेची ("एजीएम") सूचना आणि इलेक्ट्रॉनिक मतदानाची माहिती

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, Chemtech Industrial Valves Limited ("कंपनी") च्या सभासदांची ३० वी (तीसावी) वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") बुधवार, **३० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता भारतीय प्रमाण वेळेनुसार ("आयएसटी")**, व्हिडिओ परिषद ("व्हीसी") / इतर दृक्-श्राव्य माध्यमांद्वारे ("ओएव्हीएम") आयोजित करण्यात येणार आहे.सदर वार्षिक सर्वसाधारण सभा कंपनी अधिनियम, २०१३ ("अधिनियम") मधील लागू तरतुदी आणि त्याअंतर्गत करण्यात आलेले नियम, तसेच **२२ सप्टेंबर २०२५ रोजी जारी करण्यात आलेले सामान्य परिपत्रक क्रमांक ०३/२०२५**, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने वेळोवेळी जारी केलेली इतर लागू परिपत्रके ("एमसीए परिपत्रके") आणि भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळाने वेळोवेळी जारी केलेली परिपत्रके ("सेबी परिपत्रके") यांचे पालन करून आयोजित करण्यात येत आहे.

वरील नमूद केलेल्या तरतुदींचे पालन करून, कंपनीने **गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६ रोजी**, आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या वार्षिक अहवालासह वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, ज्या सभासदांचे ई-मेल पत्ते कंपनी / Bigshare Services Private Limited, इश्यू निबंधक आणि समभाग हस्तांतरण प्रतिनिधी ("आरटीए") / डिपॉझिटरी सहभागी यांच्याकडे नोंदणीकृत आहेत, अशा सभासदांना इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे पाठविली आहे.याव्यतिरिक्त, Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("SEBI LODR Regulations") मधील विनियम ३६(१)(ब) नुसार, ज्या सभासदांचे ई-मेल पत्ते कंपनी / आरटीए / डिपॉझिटरी सहभागी यांच्याकडे नोंदणीकृत नाहीत आणि जे कंपनीने निश्चित केलेल्या **सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६** या निश्चित तारखेला समभाग धारण करीत आहेत, अशा सभासदांच्या नोंदणीकृत पत्त्यावर आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या वार्षिक अहवालाचा संकेतस्थळ दुवा आणि वार्षिक अहवाल पाहण्यासाठीचा अचूक मार्ग नमूद असलेले भौतिक पत्र पाठविण्यात येत आहे.

अधिनियमाच्या कलम १०८ सह Companies (Management and Administration) Rules, 2014 मधील नियम २०, वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा, सेबीच्या सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता विनियम, २०१५ मधील विनियम ४४, एमसीए परिपत्रके, सेबी परिपत्रके आणि Institute of Company Secretaries of India यांनी जारी केलेल्या सर्वसाधारण सभांसाठीच्या सचिवीय मानकांमधील ("एसएस-२") तरतुदींचे पालन करून, कंपनी AGM च्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर सभासदांना **दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदान** तसेच **वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदानाची सुविधा** ("एकत्रितपणे इलेक्ट्रॉनिक मतदान") उपलब्ध करून देत आहे.ही सुविधा Bigshare Services Private Limited ("Bigshare") द्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे.सभासदांचे मतदानाचे अधिकार कंपनीच्या भरलेल्या इक्विटी भागभांडवलामध्ये त्यांनी धारण केलेल्या इक्विटी समभागांच्या संख्येच्या प्रमाणात असतील. यासाठी **बुधवार, २३ सप्टेंबर २०२६** ही निश्चित तारीख ("कट-ऑफ तारीख") ठरविण्यात आली आहे.

दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदानाचा कालावधी **रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता (भारतीय प्रमाण वेळ)** सुरू होईल आणि **मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता (भारतीय प्रमाण वेळ)** समाप्त होईल.त्यानंतर Bigshare द्वारे इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणाली निष्क्रिय करण्यात येईल आणि नमूद केलेल्या तारीख व वेळेनंतर मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही.ज्या सभासदांनी दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदानाद्वारे आपले मत नोंदविले आहे, ते व्हिडिओ परिषद / इतर दृक्-श्राव्य माध्यमांद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू / सहभागी होऊ शकतात; मात्र अशा सभासदांना त्या ठरावांवर पुन्हा मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

ज्या सभासदांनी दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदानाद्वारे आपले मत नोंदविलेले नाही, ते व्हिडिओ परिषद / इतर दृक्-श्राव्य माध्यमांद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू / सहभागी होऊ शकतात आणि सभेदरम्यान मतदान करू शकतात.कंपनीने वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे समभाग संपादन करणारी आणि कंपनीची सभासद बनलेली, तसेच **बुधवार, २३ सप्टेंबर २०२६** या निश्चित तारखेला समभाग धारण करणारी कोणतीही व्यक्ती, आपला **वापरकर्ता ओळख क्रमांक आणि संकेतशब्द** मिळविण्यासाठी **ivote@bigshareonline.com** या ई-मेल पत्त्यावर विनंती पाठवू शकते.तथापि, जर एखादा सभासद दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदानासाठी निबंधक आणि समभाग हस्तांतरण प्रतिनिधीकडे आधीच नोंदणीकृत असेल, तर तो सभासद मतदान करण्यासाठी त्याचा विद्यमान वापरकर्ता ओळख क्रमांक आणि संकेतशब्द वापरू शकतो.संचालक मंडळाने मतदान प्रक्रिया न्याय्य आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी **CS Shriram Imartey, S.P. Imartey And Associates** यांची **छाननी अधिकारी** म्हणून नियुक्ती केली आहे.भागधारक / गुंतवणूकदारांना इलेक्ट्रॉनिक मतदानासंदर्भात कोणतेही प्रश्न असल्यास, ते **https://ivote.bigshareonline.com** येथे उपलब्ध असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीमधील **वारंवार विचारले जाणारे प्रश्न ("एफएक्यू")** आणि डाउनलोड विभागाचा संदर्भ घेऊ शकतात.

तसेच, सभासद **ivote@bigshareonline.com** या ई-मेल पत्त्यावर संपर्क साधू शकतात किंवा **०२२-६२६३८३३८** या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करू शकतात.सभासद कंपनीचे कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी यांच्याशी कंपनीच्या **investors@chemtechvalves.com** या ई-मेल पत्त्यावर देखील संपर्क साधू शकतात.वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, वार्षिक अहवाल आणि वार्षिक सर्वसाधारण सभेशी संबंधित इतर महत्त्वाची माहिती कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे:https://www.chemtechvalves.com/investors/तसेच स्टॉक एक्स्चेंज म्हणजेच **BSE Limited** च्या संकेतस्थळावर **www.bseindia.com** आणि निबंधक व समभाग हस्तांतरण प्रतिनिधीच्या संकेतस्थळावर **https://www.bigshareonline.com/** ही माहिती उपलब्ध आहे.व्हिडिओ परिषद / इतर दृक्-श्राव्य माध्यम सुविधेद्वारे ३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहण्याची सविस्तर प्रक्रिया, वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान करण्याची पद्धत आणि ई-मेल पत्ते नोंदणी करण्याची प्रक्रिया **३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये** देण्यात आली आहे.

सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व बाबी काळजीपूर्वक वाचाव्यात आणि विशेषतः **सभेत सहभागी होण्यासाठीच्या सूचना, दूरस्थ इलेक्ट्रॉनिक मतदानाद्वारे किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान मतदान करण्याची पद्धत** याकडे विशेष लक्ष द्यावे.

दिनांक: 03.09.2026 **केमटेक इंडस्ट्रियल व्हॉल्व्हज लिमिटेडसाठी**
स्थळ: ठाणे **Sd/-**
आरोही पारीक
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

जाहीर नोटीस

प्रोसेस जमा वकील श्री. जॉन डॅनियल
ठाणे येथील मे. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
स्पे.सि.सुट क्र. ४४८/२०२२
निशाणी क्रमांक १५

बँक ऑफ बडौदा
पत्ता- विजय नगरी, घोडबंदर रोड, जिल्हा ठाणे - ४००६१५ **वादी**
विरुध्द..
१) अमित रामविलास पाठक
पत्ता- ३०१, परशवा स्वप्नलोक रेसीडन्सी, गांव उमरोली, पालघर- ४०१४०४
२) सुजीत रामविलास पाठक
पत्ता : शॉप नं. ९, बि.नं. ३, ओसवाल पार्क, जैन पार्क जवळ, जैसल पार्क, भाईंदर (पूर्व), जि. ठाणे, महाराष्ट्र-४०११०५ **... प्रतिवादी**

ज्याअर्थी, उपनिर्दिष्ट वादी यांनी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे की, ज्याअर्थी, उपनिर्दिष्ट वादी यांनी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे की, रुपये ११०४६६६.०० वसुलीसाठी दावा दाखल केला आहे. प्रतिवादी हे घर आणि व्यवसायाचे ठिकाणी केव्हाही येतात व केव्हाही जातात असा बेलीफया रिपोर्ट आला आहे. म्हणून त्याचेवर समन्सची सर्व्हिस झालेली नाही.

त्याअर्थी, याद्वारे तुम्हांला फर्मविण्यात येत आहे की, तुम्ही सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्याकरीता दिनांक **15/10/2026** सन २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात व्यक्तिगतरित्या रितसर निर्दिष्ट माहे केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जायी एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

तुम्हांला अशी ही नोटीस देण्यात येते की, तुम्ही निर्दिष्ट केलेल्या दिनांकास किया तत्पुर्वी बजावणीकरीता पत्ता देण्यास कसुर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही.

दिनांक ०१ माहे ०९ सन २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या हुकूमावरुन शिक्क्यानिशी दिली.

हुकुमावरून
सही/- **सही/-**
लिपीक शिक्का **सहायक अधीक्षक (न्यायिक)**
दिवाणी न्यायालय, व. स्तर ठाणे

जाहीर नोटीस

नोंद घ्यावी की खालील परिशिष्टात नमूद केलेली मालमत्ता श्री. दुर्गती कर्दम फुलपगार यांनी श्री. दिलीप बळीराम तेलवणे यांच्याकडून दि.२१.१२.२००६ रोजीच्या खरेदीखताद्वारे (नों. क्र. MRB-1258/2006) खरेदी केली होती. तथापि, श्री. दुर्गती क फुलपगार यांचे दि. २१.०५.२०२१ रोजी कोणतेही मृत्युपत्र न करता निधन झाले असून, सदर मालमत्तेचे वारसदार म्हणून त्यांच्या पश्चात् त्यांच्या पत्नी सौ. शशिकला दुर्गती फुलपगार आणि मुलगा श्री. नितेश दुर्गती फुलपगार हे कायदेशीर वारस आहेत. सदर कायदेशीर वारसांच्या दाव्यानुसार सदर मालमत्ता सर्व प्रकारच्या बोजांपासून मुक्त आहे.

जर कोणत्याही व्यक्तीला / व्यक्तींना, सरकारी प्राधिकरणाला किंवा संस्थेला आणि/किंवा वित्तीय संस्थेला / संस्थांना स्वर्गीय श्री. दुर्गती कर्दम फुलपगार यांच्या कायदेशीर वारसाहक्कावर कोणताही आक्षेप असेल किंवा उपरोक्त मालमत्तेत किंवा तिच्या कोणत्याही भागात वारसाहक्क, देवाणघेवाण, गहाण, बक्षीसपत्र, ताबा, विक्री, भाडेपट्टा, देखभाल, जप्ती, ट्रस्ट, परवाना इत्यादींद्वारे कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा हितसंबंध असल्याचा दावा करत असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनापासून १५ दिवसांच्या आत खाली स्वाक्षरी केलेल्या व्यक्तीला खाली नमूद केलेल्या पत्त्यावर योग्य त्या पुराव्यासह लेखी स्वरूपात कळवावे. तसे न केल्यास, असा कोणताही दावा अस्तित्वात नाही असे गृहीत धरले जाईल आणि असा कोणताही दावा असल्यास, तो सोडून दिलेला / जाणीवपूर्वक न केलेला आणि हक्क सोडलेला मानला जाईल. त्यानंतर येणारे कोणतेही दावे किंवा आक्षेप अवैध मानले जातील.

परिशिष्ट

घर क्र. २९१८, क्षेत्रफळ ५७० चौ. फू. बिगर शेती जमीन सर्व्हे नं. ६५/४/अ/भाग, प्लॉट नं. १०, क्षेत्रफळ १५० चौ. मी., गाव मुरबाड, ता. मुरबाड, जि. ठाणे.

ॲड. अमित घाडगे
B-101, उषा कमर्शिअल कॉम्प्लेक्स, वालीपीर रोड, कल्याण प. ठाणे. 421301.
फोन 8655278884

जाहीर नोटीस

सर्व लोकांस प्रस्तुत जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कळवा तालुका व जिल्हा ठाणे येथील जमिन / मिळवत गट नं. ४४ हिस्सा नं. २, क्षेत्र १३४० चौरस मिटर, या मिळकतीचे श्री. रामचंद्र रघुनाथ पाटील हे सहहिस्सेदार आहेत, श्री. रामचंद्र रघुनाथ पाटील यांचे दिनांक २०.०४.२०२४ रोजी निधन झाले असून त्यांचे पश्चात त्यांना पत्नी १) श्रीमती लता रामचंद्र पाटील, मुलगा २) श्री. सागर रामचंद्र पाटील व तीन मुली ३) सौ. प्रतिभा अक्षय शिंगे उर्फ प्रतिभा रामचंद्र पाटील, ४) सौ. सुषमा जितेंद्र भोईर उर्फ सुषमा रामचंद्र पाटील, ५) सौ. सविता विकास म्हात्रे उर्फ पिंकी रामचंद्र पाटील हेच कायदेशीर वारस आहेत, सदर नमुद वारसांव्यतिरिक्त श्री. रामचंद्र रघुनाथ पाटील यांना अन्य कोणीही वारस नाहीत, सदर वारसांबाबत कोणाची कोणती हरकत असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांत आपली हरकत नोंदवावी, मुदतीनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही. व मुदतीनंतर घेतलेली हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. कळावे, ही जाहीर नोटीस.

परिशिष्ट

मौजे कळवा तालुका व जिल्हा ठाणे येथील जमिन / मिळकत गट नं. ४४ हिस्सा नं. २, क्षेत्र ९३४० चौरस मिटर क्षेत्रापैकी ८३.७५ चौरस मिटर क्षेत्राकरीता. सही/-

दिनांक: : ०३/०९/२०२६ **१) श्रीमती लता रामचंद्र पाटील**
२) श्री. सागर रामचंद्र पाटील
३) सौ. प्रतिभा अक्षय शिंगे उर्फ प्रतिभा रामचंद्र पाटील,
४) सौ. सुषमा जितेंद्र भोईर उर्फ सुषमा रामचंद्र पाटील,
५) सौ. सविता विकास म्हात्रे उर्फ पिंकी रामचंद्र पाटील
पत्ता: २०४, रघुनाथ अपार्टमेंट, पाखाडी, कळवा सुपर मार्केट जवळ, खारीगाव, कळवा

PUBLIC NOTICE

NOTICE IS HEREBY GIVEN TO ALL Concerned that my clients i.e. (1) JITENDRA S/O. BABULAL GUPTA (2) BIRENDRA BABULAL GUPTA (3) MAHENDRA BABULAL GUPTA being the claimant to be the Surviving Legal heirs and representatives of BABULAL MAHAVIR GUPTA for the Flat No. A/304, Third Floor, Building Known as Pratiksha Enclave, situated at Opp. Indralok, New Golden Nest, Bhayander (E), Thane-401105, (hereinafter known as the said Flat).

FURTHER (1) BIRENDRA BABULAL GUPTA (2) BABULAL MAHAVIR GUPTA (during his life time) was the owners of the said Flat, having being purchased from ASHUTOSH DURGAPRASAD PANDEY, by way of Agreement dated 02/06/2011 and the same was registered at Thane under serial No. TNN4-04651-2011 dated 03/06/2011. But the Owner i.e. BABULAL MAHAVIR GUPTA alias BABU LAL GUPTA (as per Death Certificate) had expired on dated 23/12/2018, Katra Chetarai, Hilauli, Pankunwar Khera, Purwa, Unnao, Uttar Pradesh-209821, having death Registration No. D-2021:9-17967-000030, dated 25/11/2021 (Issued by Government of Uttar Pradesh) and his Wife i.e. KALAVATI BABULAL GUPTA alias KALAVATI GUPTA (as per Death Certificate) is also expired on dated 09/09/2025, having death Registration No. D202527908280001244, dated 14/10/2025 and leaving behind his Three Sons i.e. (1) JITENDRA S/O. BABULAL GUPTA (2) BIRENDRA BABULAL GUPTA (3) MAHENDRA BABULAL GUPTA as his only legal heirs and representatives on accordance with the law of succession under which he was governed at the time of his death.

THEREFORE ANY MEMBER OF PUBLIC or the Competent Authority appointed under the Maharashtra Stamps Act, 1958, having objection against the Legality of (1) JITENDRA S/O. BABULAL GUPTA (2) BIRENDRA BABULAL GUPTA (3) MAHENDRA BABULAL GUPTA being the claimant to be the Surviving Legal heirs and representatives of BABULAL MAHAVIR GUPTA of the said Flat, in any manner howsoever and whatsoever by way of Gift, occupancy right, inheritance, mortgage, transfer, sale, gift, lease, license, lien, charge, trust, maintenance, easement, tenancy in perpetuity or any civil or criminal litigations or recovery proceedings should intimate in writing to me within 7 days from the date of Publication, hereof with proof thereof against accountable receipt or by registered A/D post, failing which the claim or claims, if any of such person/s will be considered to have been waived and/or abandoned. **Sd/-**

Place: Mira Road (E), Thane. **Adv. Akta M. Parikh**
Date: 04-09-2026 **Shop No. 21 & 22, 1st Floor, Crystal Plaza, Station Road, Mira Road (E), Dist: Thane-401107.**

जाहिर नोटीस

कावेरी सहकारी गृहनिर्माण संस्था (म.) रौनक पार्क, बी-१, बिल्डींग, कोकणीपाडा, पोखरण रोड नं. २, ठाणे (प) ४०० ६१० मधील खालील सभासद मयत झाले.

श्री. शुभलिंग बस्सपा बागी मयत दि. १८.१०.२०२२ फ्लॅट नं.: बी-१/२०८
Mr. Subling Basappa Bagi Dt. of Death : 18.10.2022 Flat No. B-1/208

वरील सभासदाच्या नावे कावेरी सहकारी गृहनिर्माण संस्था (म.) मधिल सदनिका नं बी-१/२०८ होती. सदरच्या घरमालकांनी पत्नी श्रीमती. पार्वती शुभलिंग बागी (५०%) व मुलगा श्री. श्रीशल शुभलिंग बागी (५०%) यांची वारस नोंद केली होती. सदर घरमालक मयत झाले असून आता त्यांचे कायदेशीर वारसांपैकी श्री. श्रीशल शुभलिंग बागी (**Mr. Shrishal Subling Bagi**) यांनी सदर सदनिकेच्या संदर्भातील भाग त्यांचे नांवावर हस्तांतरित करण्यासाठी सोसायटीकडे अर्ज केला आहे. या प्रस्तावास कोणाहि नातेवाईक वालीवारसाची तसेच अन्य कोणत्याही व्यक्तीची हरकत किंवा तक्रार असल्यास ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आंत लेखी कळवावे. तद्नंतर सदर भाग हस्तांतरण प्रस्तावास कोणाही इतर नातलग व/वा वालीवारस अथवा व्यक्तींची हरकत नाही असे गृहीत धरून संस्था हया हस्तांतरण प्रस्तावाबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करील. कृपया संबंधीतांनी नोंद घ्यावी. आपले,

ठाणे दि. ३१.०८.२०२६ सही/-
. कळावे ही विनंती. **कावेरी को ऑ. हौ.सो.लि.**
अध्यक्ष सचिव

ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राइझ लिमिटेड

ACRE — MAKING ASSETS WORK

नोंदणीकृत कार्यालय : १४ वा मजला, इरॉस कॉर्पोरेट टॉवर, नेहरू प्लेस, नवी दिल्ली : ११००१९ दू. : ९१-११-४३४४५६०० फॅक्स : ९१-११-४३११५६१८
कॉर्पोरेट कार्यालय : युनिट क्र. : कार्यालय क्र. १०१, कल्पतरू इन्फीनिया, प्लॉट बी, ग्रँड हयात जवळ, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००५१, महाराष्ट्र. दू. : ०२२ ६८६४३१०१.
ई-मेल : care.arc@acrelindia.in संकेतस्थळ : www. acrelindia.in CIN : U65993DL2002PLC115769

परिशिष्ट IV-A
स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स, २००२ मधील नियम ८(६) व ९(१) च्या तरतूदींसह वाचित 'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२' अंतर्गत, स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलावाद्वारे विक्रीची सूचना.

सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार, सह-कर्जदार, गहाणकार व हमीदार यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता, ज्या **मूळ कर्जदाता/हस्तांतरणकर्ता बँकेकडे** तारण/भारित होत्या आणि ज्यांचा **प्रत्यक्ष ताबा हस्तांतरणापूर्वीच हस्तांतरणकर्ता बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतला होता**, त्या मालमत्ता आता **'ॲसेट्स केअर अँड रिकन्स्ट्रक्शन एंटरप्राइझ लिमिटेड'** [CIN : U65993DL2002PLC115769] (**'प्रतिभूत धनको'**) यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, कर्जदार, सह-कर्जदार, गहाणदार आणि हमीदार यांच्याकडून येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, प्रतिभूत धनको आता सदर मालमत्तांची विक्री 'जशी आहे तशी', 'ज्या स्थितीत आहे तशी' आणि 'जे काही आहे तस' या तत्त्वावर करतील;

यासाठी प्रत्येक मालमत्तेकरिता खाली नमूद केलेली राखीव किंमत आणि इसारा रक्कम ठेव लागू असेल :

तारण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील

अ. क्र.	कर्ज खाते क्र. आणि एसीआरइ ट्रस्टचे नाव	कर्जदार/सह-कर्जदार/ गहाणकार/हमीदारांचे नाव	२ - जून - २६ आणि २८ - फेब्रुवारी - २६ रोजीची एकूण थकीत देय रक्कम, त्यासोबतच प्रत्यक्ष भरणा आणि वसुलीच्या तारखेपर्यंत लागू होणारे व्याज, शुल्क आणि खर्च.	राखीव किंमत (रु. मध्ये)	इसारा रक्कम ठेव (रु. मध्ये)	धनाकर्ष/आटीजीएस/ एनईएफटीद्वारे इरठे अदा करण्यासाठी बँक खात्याचा तपशील	लिलाव दिनांक आणि वेळ	इरठे दिनांक आणि वेळ	पीडीएफ पाहण्यासाठी बारकोड स्कॅन करा
१	10052182665 ACRE 158 TRUST	नागनाथ मारोती सावरे शिल्पा नागनाथ सावरे	रु. ८९,५७,४९०/- (रुपये एकोणनव्वद लाख सत्तावन हजार चारशे नव्वद मात्र)	रु. ४३,५०,०००/- (रुपये त्रेचाळीस लाख पन्नास हजार मात्र)	रु. ४,३५,०००/- (रुपये चार लाख पस्तीस हजार मात्र)	बँक खात्याचे नाव : एसीआरई-१५८-ट्रस्ट खाते क्रमांक : ०९०११०२००००४१८७६ बँक : आयडीबीआय बँक आयएफएससी : आयबीकेएल००००९०१	१५ ऑक्टोबर, २०२६ दु. २:३० ते दु. ३:३० वा.	१४ ऑक्टोबर, २०२६ दु. ४:०० वा. पर्यंत	
प्रतिभूत मालमत्तेचा तपशील : 'ग्लॅडिओला पॅराडाईज', शत्रुंजय नगर, कात्रज बायपास रोड येथील 'सी' विंगमधील चौथ्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक २३ या निवासी मालमत्तेचे सर्व अंगीकृत भाग; जी सर्व्हे क्रमांक ५८/७अ आणि ७८/१, ७८/२ व ७अ/२, कोंढवा बुद्रुक, जिल्हा पुणे ४११ ०४८ येथे स्थित आहे. या मालमत्तेचे क्षेत्रफळ ६७.८४ चौ.मी. म्हणजेच ७३० चौ. फूट असून त्यासोबत १०.८० चौ.मी. म्हणजेच ११६.२५ चौ. फूट) आकाराची संलग्न टेरेस (गच्ची) आहे; तसेच मंजूर आराखड्यानुसार याचे कार्पेट क्षेत्रफळ निश्चित केले आहे. या मालमत्तेच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत : पूर्व : फ्लॅट क्रमांक १९, दक्षिण : फ्लॅट क्रमांक २२, पश्चिम : अंतर्गत मार्ग /पॅसेज, उत्तर : फ्लॅट क्रमांक २४.									
२	AFH000100412873 ACRE 166 TRUS	अनिल व्ही मांजरेकर सौ स्नेहा चातांबळी	रु. ३३,५५,२५८/- (रुपये तेहतीस लाख पंचावन्न हजार दोनशे अठ्ठावन मात्र)	रु. १५,००,०००/- (रुपये पंधरा हजार मात्र)	रु. १,५०,०००/- (रुपये एक लाख पन्नास हजार मात्र)	बँक खात्याचे नाव : एसीआरई-१६६-ट्रस्ट खाते क्रमांक : ०९०११०२००००४२११२ बँक : आयडीबीआय बँक आयएफएससी : आयबीकेएल००००९०१	२३ सप्टेंबर, २०२६ दु. २:३० ते दु. ३:३० वा.	२२ सप्टेंबर, २०२६ दु. ४:०० वा. पर्यंत	
प्रतिभूत मालमत्तेचा तपशील : 'साई स्वप्न अपार्टमेंट क्र. २' या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील 'डी' विंगमधील फ्लॅट/दुकान क्र. ३०४ चे सर्व अंगीकृत भाग; ज्याचे क्षेत्रफळ ४९.२५ चौ. मीटर (बिल्ट-अप ५३० चौ. फूट - सुपर/ बिल्ट-अप) इतके आहे. ही इमारत सर्व्हे क्र. १७५, हिस्सा क्र. १ (एकूण क्षेत्रफळ ०-१४-० पैकी ०-०८-० क्षेत्रफळ) या जमिनीवर बांधलेली असून, ती विरार (पूर्व) गाव, वसई-विरार महानगरपालिका क्षेत्र, तालुका व नोंदणी उप-जिल्हा: वसई-२ (विरार), जिल्हा व नोंदणी जिल्हा: पालघर येथे स्थित आहे.									
३	AFH000100281645 ACRE 166 TRUS	राजकुमार पटवा अमृत पटवा	रु. २१,१४,४९५/- (रुपये एकवीस लाख चौदा हजार चारशे पंच्याण्णव मात्र)	रु. ८,००,०००/- (रुपये आठ हजार मात्र)	रु. ८०,०००/- (रुपये ऐंशी हजार मात्र)	बँक खात्याचे नाव : एसीआरई-१६६-ट्रस्ट खाते क्रमांक : ०९०११०२००००४२११२ बँक : आयडीबीआय बँक आयएफएससी : आयबीकेएल००००९०१	२३ सप्टेंबर, २०२६ दु. २:३० ते दु. ३:३० वा.	२२ सप्टेंबर, २०२६ दु. ४:०० वा. पर्यंत	
प्रतिभूत मालमत्तेचा तपशील : 'ड्रीम सिटी' या प्रकल्पांतर्गत; गाव - बोईसर, तालुका - पालघर, जिल्हा - पालघर येथे स्थित; इमारत क्र. १ मधील 'ई' विंगमध्ये, पहिल्या मजल्यावर असलेल्या १०६ क्रमांकाच्या निवासी सदनिकेचा/ व्यावसायिक दुकानाचा (ज्याचे एकूण बिल्ट-अप क्षेत्रफळ ४३५ चौरस फूट इतके आहे) तो संपूर्ण भूखंड व त्यावरील बांधकामाचे सर्व अंगीकृत भाग.									
४	H405HLD1061487 / H405HLT1068294 ACRE 178 Trus	विनोद विक्रम बागुल विनया विनोद बागुल	रु.३०,३७,११७/- (रुपये तीस लाख सदतीस हजार एकशे सतरा मात्र)	रु. १५,००,०००/- (रुपये पंधरा हजार मात्र)	रु. १,५०,०००/- (रुपये एक लाख पन्नास हजार मात्र)	बँक खात्याचे नाव : एसीआरई-१७८-ट्रस्ट खाते क्रमांक : ०९०११०२००००४२६१७ बँक : आयडीबीआय बँक आयएफएससी आयबीकेएल००००९०१	१५ ऑक्टोबर, २०२६ दु. २:३० ते दु. ३:३० वा.	१४ ऑक्टोबर, २०२६ दु. ४:०० वा. पर्यंत	
प्रतिभूत मालमत्तेचा तपशील : खालीलप्रमाणे वर्णन केलेली संपूर्ण मालमत्तेचे सर्व अंगीकृत भाग : फ्लॅट क्र. ००४, विंग 'अ', तळमजला, श्रीनिवासा रेसिडेन्सी; सर्व्हे क्र. २६०, हिस्सा क्र. ६बी, क्षेत्रफळ सुमारे ३५० चौ.मी., जे सुमारे ११७० चौ.मी. क्षेत्रापैकी आहे; सर्व्हे क्र. २६१/३/२, क्षेत्रफळ सुमारे ० हे. ०१ आर. ५० चौ.मी. म्हणजेच १५० चौ.मी., एकूण क्षेत्रफळ सुमारे ० हे. ०४ आर. ५० चौ.मी. म्हणजेच ४५० चौ.मी.; सर्व्हे क्र. २६१/२/१ क्षेत्रफळ सुमारे ० हे. ०२ आर. ८४ चौ.मी. व पोटखराब ० हे. ०० आर. १६ चौ.मी., एकूण क्षेत्रफळ सुमारे ० हे. ०३ आर. ०० चौ.मी. म्हणजेच ३०० चौ.मी.; सर्व्हे क्र. २६१/३/३ क्षेत्रफळ सुमारे ० हे. ०६ आर. ६० चौ.मी. म्हणजेच ६६० चौ.मी., आकार रु. ०.९४; सर्व्हे क्र. २६१/२/३ क्षेत्रफळ सुमारे ० हे. ०८ आर. ८९ चौ.मी. व पोटखराब ० हे. ०० आर. ५१ चौ.मी., एकूण क्षेत्रफळ सुमारे ० हे. ०९ आर. ४० चौ.मी. म्हणजेच ९४० चौ.मी.; सर्व्हे क्र. २६१/१ (क्षेत्रफळ सुमारे ० हे. ०३ आर. ३० चौ.मी. म्हणजेच ३३० चौ.मी.; ही सर्व मालमत्ता कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या हद्दीत, अंबरनाथ उप-नोंदणी जिल्हा आणि ठाणे नोंदणी जिल्ह्यांतर्गत येते.									
५	38803464000010 ACRE 196 Trust	रामकैलाश लालबहादूर यादव	रु.२०,०९,५७५/- (रुपये वीस लाख नऊ हजार पाचशे पंच्याहत्तर मात्र)	रु. १८,८०,०००/- (रुपये अठरा लाख ऐंशी हजार मात्र)	रु. १,८८,०००/- (रुपये एक लाख अठ्याऐंशी हजार मात्र)	बँक खात्याचे नाव : एसीआरई-१९६-ट्रस्ट खाते क्रमांक : ०५४३०२००००५२३५१ बँक : इंडियन ओव्हरसीज बँक आयएफएससी आयओबीए०००००५४३	१५ ऑक्टोबर, २०२६ दु. २:३० ते दु. ३:३० वा.	१४ ऑक्टोबर, २०२६ दु. ४:०० वा. पर्यंत	
प्रतिभूत मालमत्तेचा तपशील : अनुसूची 'अ' - मालमत्तेचे वर्णन : गाव बदलापूर, तालुका अंबरनाथ (कुलगाव बदलापूर नगरपरिषद क्षेत्र) येथील सर्व्हे क्र. १३५, हिस्सा क्र. १-बी (क्षेत्रफळ २७०० चौ.मी.) या बिगर-शेती स्थावर मालमत्तेचा/जमिनीचा तुकडा; ज्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत - उत्तर: श्री. दत्तू मुंडे यांची मालमत्ता, दक्षिण: रस्ता, पूर्व: डी.पी. रस्ता, पश्चिम: श्री. गणेश फुलोरे यांची मालमत्ता. अनुसूची 'ब' - सदनिकेचे वर्णन : 'मोतिराम प्रिव्हिलेज' या इमारतीच्या 'ए' विंगमधील तिसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. ३०१ (कार्पेट क्षेत्रफळ ४१.०७ चौ.मी.); ही इमारत गाव बदलापूर, तालुका अंबरनाथ (कुलगाव बदलापूर नगरपरिषद क्षेत्र) येथील सर्व्हे क्र. १३५, हिस्सा क्र. १-बी (क्षेत्रफळ २७०० चौ.मी.) या बिगर-शेती अचल मालमत्तेवर/जमिनीवर बांधली जात आहे त्याचे सर्व अंगीकृत भाग.									

लिलाव प्रक्रीया संदर्भात महत्वाची माहिती		
१	इरठेचा भरणा उपरोक्त नमूद बँक खात्याच्या नावे काढलेल्या धनाकर्ष/आरटीजीएस/एनईएफटी द्वारे करावा	
२	लिलावासाठी संकेतस्थळ	www.bankeauctions.com
३	संपर्काचा तपशील	1800-206-2989/auction.support@acreindia.in/rohan.sawant@ acreindia.in
४	केवळ पूर्व सूचनेद्वारे मालमत्तेचे निरीक्षण	
५	विक्रीच्या सविस्तर अटी आणि नियमांसाठी, कृपाया www.acreindia.in.in/www.bankeauctions.com वर भेट द्या	

दिनांक : ०४.०९.२०२६
स्थळ : पालघर, ठाणे
स्वाक्षरी/-
प्राधिकृत अधिकारी,
ॲसेट्स केअर ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन एन्टरप्रायजेस लि.